# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3460/शि.वि./2014
दि. 29/11/2014

**प्रति,**

मुख्याध्यापक/मुख्याध्यपिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :– शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर रायसोनी गृप नागपूर, रमन विज्ञान केंद्र नागपूर, यशवंराव चव्हाण प्रतिष्ठान तर्फे अक्षरभूषण मधूकर भाकरे स्मृती सुवाच्य हस्ताक्षर स्पर्धा –2014 मध्ये सहभाग घेण्याबाबत.**

**संदर्भ :– श्री. म.न.मेंडजोगे, अध्यक्ष, की कै. मधूकरराव भाकरे स्मृती प्रतिष्ठान, महाल, नागपूर यांचे पत्र क्र. 212/2014 दि. 20.11.2014.**

उपरोक्त विषयाच्या अनुषगांने कळविण्यात येते की, कै.अक्षरभुषण मधूकरराव भाकरे स्मृती प्रतिष्ठान व शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर रायसोनी गृप नागपूर, रमन विज्ञान केंद्र नागपूर, यशवंराव चव्हाण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त उपक्रमा अंतर्गत अक्षरभूषण मधूकर भाकरे स्मृती सुवाच्य हस्ताक्षर स्पर्धा –2014 चे आयोजन दि. 20.12.2014 रोजी रमन विज्ञान केंद्र येथे सकाळी 9.30 वाजता करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये सहभागी होण्यास्तव आपल्या शाळेतील सुंदर व वळणदार अक्षरात लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांची शालेय स्तरावर स्पर्धा दि.15.12.2014 पूर्वी घेवून एका उत्कृष्ठ विद्यार्थ्याची निवड करून त्याला उपरोक्त स्पर्धेमध्ये सहभागी होण्यास्तव आयोजकांशी संपर्क साधावा व या स्पर्धेचा लाभ आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना द्यावा. ही स्पर्धा तीन गटांत होणार असून वर्ग 1 ते 4 – **अ** गट, 5 ते 7– **ब** गट, 8 ते 10 क गट असे गट राहतील. अंतिम स्पर्धेकरीता निवड झालेल्या विद्यार्थ्याला परीक्षा बोर्ड सहीत एका शिक्षकांसोबत स्पर्धेत पाठवावे. ही स्पर्धा मराठी किंवा हिंदी भाषेत राहील. याबाबत अधिक माहितीकरीता स्पर्धा प्रमुख श्री. अभय भाकरे यांच्याशी दूरध्वनी क्र. 0712–2720414 व भ्रमणध्वनी क्र.9822721058/9822719812 वर संपर्क साधावा.

**शिक्षणाधिकारी,**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर.**

**प्रतिलिपी :–**

1) मा. उपायुक्त, म.न.पा, नागपूर यांना माहितीस्तव.
2) श्री. म.न.मेंडजोगे, अध्यक्ष, की कै. मधूकरराव भाकरे स्मृती प्रतिष्ठान, महाल, नागपूर

PC:2/D:\reshma:/Tembhurne sir \ Letter 1.doc